# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 20 June 2024
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक – २० जून २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते जम्मू-काश्मीर इथं पंधराशे कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी
- नीट गैरप्रकारांशी संबंधित विविध उच्च न्यायालयांत दाखल खटल्यांच्या सुनावणीला सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती

आणि

- प्रत्येक तालुक्यात लाभार्थ्यांची संख्या एक हजारांपर्यंत नेण्याचं अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचं लक्ष्य

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून जम्मू-काश्मीरच्या दोन दिवसीय दौऱ्यावर असून ते थोड्याच वेळात पंधराशे कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी करणार आहेत. आपल्या दौऱ्यात पंतप्रधान जागतिक योग दिनानिमित्त उद्या आयोजित कार्यक्रमातही सहभागी होणार आहेत.

****

नीट गैरव्यवहार प्रकरणांशी संबंधित देशातील विविध उच्च न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या खटल्यांच्या सुनावणीला सर्वोच्च न्यायालयाने आज स्थगिती दिली. न्यायमूर्ती विक्रम नाथ यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठानं नीट परीक्षा आयोजित करणाऱ्या नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या हस्तांतरण याचिकेवर सुनावणी करताना ही स्थगिती दिली.

सर्वोच्च न्यायालयाने गेल्या आठवड्यात अशाच एका हस्तांतरण याचिकेवर नोटीस जारी केली. तरीही नीट परीक्षेतील अनियमिततेच्या अनेक प्रकरणांची विविध उच्च न्यायालयांमध्ये सुनावणी सुरू असल्याचं सुनावणीदरम्यान एनटीएच्या वकीलांनी

सांगितलं. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयात आठ जुलै रोजी बदली याचिका आणि परीक्षा रद्द करण्याच्या याचिकांवर सुनावणी होणार आहे. यापूर्वी १४ जून रोजी सर्वोच्च न्यायालयानं दिल्ली उच्च न्यायालयात प्रलंबित असलेली याचिका सर्वोच्च न्यायालयात हस्तांतरित करण्यासाठी नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या याचिकेवर नोटीस बजावली होती.

****

वैद्यकीय प्रवेशासाठी पात्र ठरवणारी नीट युजी परीक्षा पुन्हा घ्यावी, या मागणीसाठी धाराशिव इथं आज विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. यावेळी मोर्चेकऱ्यांनी आपल्या मागण्यांचं निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना दिलं. या परीक्षेत ६९ जणांना ७२० पैकी ७२० गुण मिळाले, यामध्ये ६७ मुलं हरियाणातील एकाच परीक्षा केंद्रातून असल्याचं त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे. या परिक्षेत ६९० गुण मिळूनही विद्यार्थी वैद्यकिय प्रवेशासाठी पात्र होताना दिसत नसल्याचंही या निवेदनात नमूद करण्यात आलं आहे.

****

नुकत्याच झालेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीनंतर ईव्हीएम पडताळणीसाठी एकूण अकरा अर्ज प्राप्त झाले आहेत. उत्पादक कंपनी अर्ज प्राप्त झाल्यापासून दोन आठवड्यांच्या आत इव्हीएम तपासणी आणि पडताळणीसाठी वेळापत्रक जारी करणार आहे. इव्हीएम पडताळणीसाठी राज्यातील अहमदनगर लोकसभा मतदारसंघातून अर्ज प्राप्त झाला आहे.

****

मुंबई पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत आपल्या पक्षाच्या मतदारांचे अर्ज बाद केल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार अनिल परब यांनी केला आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. ज्या मतदारांचे अर्ज आम्ही निवडणूक कार्यालयात पाठवले होते, त्यातील मोठ्या प्रमाणावरील अर्ज हे ठरवून बाद केले आहेत, आणि भारतीय जनता पक्षाकडून दिलेले अर्ज स्वीकारून त्यांची नावे मतदार यादीत आहेत, असा आरोप परब यांनी केला. अर्ज का बाद झाले याची कारणे आम्हाला सांगावी, अशी मागणी आपण निवडणूक अधिकारी कार्यालयात केली असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

मराठा आणि ओबीसी समाजाच्या मागण्यांबाबत विचार करण्यासाठी केंद्र सरकारनं पुढाकार घ्यावा असं मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी व्यक्त केलं आहे. ते आज बारामती इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. या समाजाच्या आंदोलनांमुळे सामाजिक तणाव निर्माण होऊ नये, म्हणून केंद्र सरकारनं काळजी घ्यावी, असंही पवार यांनी यावेळी सांगितलं.

****

राज्यातील पांढऱ्या शिधापत्रिकाधारक कुटुंबांना आता महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्यमान भारत प्रधानमंत्री योजनेचा लाभ मिळणार आहे. यासाठी पांढऱ्या शिधापत्रिका आधार कार्डशी संलग्न करण्याचे आदेश अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागानं आज सर्व जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना दिले. त्यामुळं राज्यातील लाखो पांढऱ्या शिधापत्रिकाधारक कुटुंबांसाठी आरोग्य सुविधा मोफत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

****

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्यात लाभार्थ्यांची संख्या एक हजारांपर्यंत नेण्याचं लक्ष्य असल्याचं महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी सांगितलं आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयात महामंडळाच्या आढावा बैठकीत बोलत होते. महामंडळाअंतर्गत येणाऱ्या योजना अधिक सक्षमपणे ग्रामस्तरावर तसंच तालुका पातळीवर पोहचवण्यासाठी सार्वत्रिक प्रयत्नांची गरज असल्याचं मत त्यांनी यावेळी व्यक्त केलं. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आतापर्यंत विविध बँकांनी महामंडळाच्या योजनेसाठी ६५० कोटी रुपयांचं कर्ज मंजूर केलं असून त्याचा लाभ ८ हजार ६०३ लाभार्थ्यांनी घेतला आणि महामंडळानं ७३ कोटी रुपयांचा व्याजाचा परतावा लाभार्थ्यांना परत केल्याचं ते यावेळी म्हणाले.

****

पंतप्रधान पिक विमा पीक विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०२४-२५ वर्षासाठी एक रुपयांत विमा काढण्यात येत आहे. नैसर्गिक आपत्ती, पीक काढणीनंतरचं नुकसान या संकटापासून पिकांना विमा संरक्षण मिळणार आहे. यामध्ये कापूस पिकाला प्रति हेक्टर सर्वाधिक ५९ हजार ९८३ रूपये, मूग पिकाला २५ हजार ८१७ रूपये, उडीद पिकाला २६ हजार २५, ज्वारी पिकाला ३२ हजार १२५, सोयाबीन पिकाला ५५ हजार ५००, मका पिकाला ३५ हजार ५९८ तर तूर

पिकाला ३६ हजार ८०२ रूपये पिकविमा प्राप्त होणार आहे. पीक विमा भरण्याची अंतिम मुदत १५ जुलै असून शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, आवाहन कृषि विभागानं केलं आहे.

****

आषाढी एकादशीनिमित्त धुळे तालुक्यातल्या श्रीक्षेत्र रानमळा ते श्री क्षेत्र पंढरपूर पायी दिंडी विठू नामाच्या गजरात पंढरपूरच्या दिशेने आज मार्गस्थ झाली. या दिंडीचं हे २९ वं वर्षे असून यंदाही दिंडीदरम्यान समाजप्रबोधनाचं कार्य केलं जाणार आहे. या अंतर्गत गावोगावी भजन, भारुड, कीर्तन तसंच रक्तदानाचं महत्त्व आणि फायदे पटवून देणं, स्त्रीभ्रूण हत्या, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी प्रबोधन, अंधश्रद्धा निर्मूलन, पाणी आडवा पाणी जिरवा या विषयावर प्रबोधन करण्यात येणार आहे.

****

उद्या नागपूर इथं केंद्रीय आयुर्वेदिक विज्ञान संशोधन परिषद आणि आयुष मंत्रालयामार्फत आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात येणार आहे, अशी माहिती प्रादेशिक आयुर्वेद संशोधन संस्था नागपूरचे सहायक संचालक डॉ. मिलिंद सूर्यवंशी यांनी दिली. उद्या साजऱ्या होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त ते नागपूर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते.

देशव्यापी उपक्रमाअंतर्गत उद्या शहरात स्थानिक पातळीवर, प्रादेशिक आयुर्वेद संशोधन संस्था, नागपूर इथं सकाळी साडे सहा वाजता योग दिनाचा कार्यक्रम सुरू होईल. "स्वत:साठी आणि समाजासाठी योग" ही या वर्षीची योगाची संकल्पना आहे. योगाभ्यासाचे दीर्घकालीन फायदे तसंच वैयक्तिक, सामाजिक, शारिरीक आणि मानसिक सुधारणा कशी करता येईल यावर भर दिला जात असल्याचंही सूर्यवंशी यांनी सांगितलं.

****

नांदेड जिल्हा परिषदेअंतर्गत सर्व कार्यालयात शाश्वत स्वच्छता राहावी यासाठी विशेष स्वच्छता मोहिम राबवण्यात येत आहे अशी माहिती नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी दिली आहे.

दर महिन्याच्या २५ तारखेला जिल्हा परिषदेसह जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्या, ग्रामपंचायत, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्र, पशुवैद्यकीय दवाखाने तसेच जिल्हा परिषदे अंतर्गत तालुका स्तरावरील सर्व कार्यालयात

स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. स्वच्छतेच्या बाबतीत कर्मचाऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणं, पर्यावरणपूरक साधनांचा वापर वाढवणं हा यामागचा उद्देश असल्याचही करनवाल यांनी सांगितलं.

****

कृषी तंत्रज्ञानाचा प्रभावी प्रसार करण्यासाठी कृषि विभागाच्या वतीनं नांदेड जिल्ह्यात २०२४-२५ वर्षातील खरीप हंगामात सोयाबीन, कापूस, तूर या पिकांसाठी ३०८ पिकनिहाय शेतीशाळा प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. एका शेतीशाळेमध्ये २५ शेतकऱ्यांचा समावेश असून जिल्ह्यात एकूण ७ हजार ७०० शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाचा फायदा होणार आहे. या शेतीशाळेत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभाग घ्यावा, असं आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी भाऊसाहेब बऱ्हाटे यांनी केलं आहे.

****

येत्या दोन दिवसांत कोकणात बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र काही ठिकाणी, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी तर विदर्भात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

****